॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyantoorth', Vishnupuri, Nandod - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

Post Graduate Section website: srtmun.ac.in

E-mail: pg@srtmun.ac.in

संदर्भ: पदव्युत्तर / कोर्सवर्क मार्क मेमो/२०२६-२७/९१२४ दि. ०४/११/२०२६

प्रति,
मा. संचालक/प्राचार्य,
सर्व संशोधन केंद्र प्रमुख,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय :— SWAYAM/NPTEL चे प्रमाणपत्र Ph. D. Portal वर अपलोड करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.
संदर्भ :— १. पदव्युत्तर/एनपीटीइएल/पीएचडीकोर्सवर्क/२०२५-२६/६९८९ दि. १२.०१.२०२६
२. पदव्युत्तर/कोर्सवर्क मार्क मेमो/२०२६-२७/१९१७ दिनांक २३.१०.२०२६

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र २ नुसार संशोधन केंद्र प्रमुख, मार्गदर्शक व विद्यार्थ्यांना कोर्सवर्क SWAYAM/NPTEL चे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या Ph. D. Portal दिनांक ०६/११/२०२६ पर्यंत अपलोड करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी मार्गदर्शक व विद्यार्थ्यांनी ही तारिख वाढवून देण्याबाबत विनंती केली आहे.

त्यानुसार आपणास कळवण्यात येते की, SWAYAM/NPTEL चे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या Ph. D. Portal वर आपले युजर नेम व पासवर्ड चा वापर करून त्यानंतर Course work च्या बटण वर क्लीक करून मार्क भरून उत्तीर्ण/अनुतीर्ण प्रमाणपत्र दिनांक २१/११/२०२६ पर्यंत अपलोड करावेत व त्यानंतर मार्गदर्शकांनी मान्यता देवून संबधित केंद्राचे प्रमुख यांनी मान्यता दयावी. त्यानंतर विद्यार्थ्यांनी Ph. D .Portal वर जाऊन अंतिम प्रिंट काढुन त्यावर स्वत:ची स्वाक्षरी, मार्गदर्शकांची स्वाक्षरी व संशोधन केंद प्रमुखाची स्वाक्षरी घेवुन संशोधन केंद्राकडे हार्डकॉपी जमा करावी. संशोधन केंद्राने सर्व प्रस्ताव एकत्रीत करून परीक्षा विभागात दिनांक ३० नाव्हेंबर २०२६ पर्यंत जमा करावेत.

याबाबत काही अडचण आल्यास **pet@srtmun.ac.in** या मेल वर कळवावे. तसेच तंत्रीक अडचण असल्यास ९८८१३४१२२८ व ९५११७९२३५८ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा. प्रमाणपत्र अपलोड करण्याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या दिनांक २३.१०.२०२६ रोजीच्या पत्रासोबत जोडण्यात आली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी. ही विनंती.

सहा.कुलसचिव
पदव्युत्तर विभाग

टिप: SWAYAM/NPTEL चे प्रमाणपत्र अपलोड करताना घ्यावयाची खबरदारी या बाबतीत स्कोर कार्ड ग्राहय धरले जाणार नसून, SWAYAM/NPTEL चे असे प्रमाणपत्र की ज्यावर अंतर्गत (Online Assignments) व बहिस्थ (Proctored exam) परीक्षेतील गुण यांचा अंतर्भाव असेल. तेच प्रमाणपत्र ग्राहय धरले जातील.

प्रत. माहितीस्तव
१. मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यलय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. सर्व अधिष्ठाता सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत. माहितीस्तव तथा कार्यवहीस्तव.
१. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ,
२. सर्व संशोधन केंद्र प्रमुख यांना प्रत देवून कळविण्यत येते की, SWAYAM/NPTEL चे प्रमाणपत्र Ph. D. Portal वर अपलोड करण्याबाबत सर्व संशोधक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावे.

Scanned with OKEN Scanner




पीएच.डी. कोर्स वर्क

लॉगिन आणि फॉर्म भरण्याची पद्धत

ही मार्गदर्शिका पीएच.डी. कोर्स वर्कचा फॉर्म ऑनलाइन भरण्यासाठी आहे. प्रत्येक स्टेपमध्ये स्क्रीनशॉट दिलेला आहे; स्क्रीनशॉटमध्ये लाल बॉक्स आणि क्रमांक दाखवले आहेत, त्यानुसार कृती करा. स्क्रीनशॉटमधील सर्व तपशील (नाव, मोबाईल, ईमेल इत्यादी) डेमो आहे.

स्टेप 1: लॉगिन करणे



चित्र 1: लॉगिन पेज


1. कोणताही ब्राउझर (Chrome, Edge इत्यादी) उघडा.
2. वरती ॲड्रेस बारमध्ये **https://pet.srtmun.ac.in/login** हे टाका आणि Enter दाबा. **(1)**
3. **Username** मध्ये तुमचा युजरनेम टाका (उदाहरण: U123567, हे फक्त डेमो आहे). **(2)**
4. **Password** मध्ये तुमचा पासवर्ड टाका. **(3)**
5. खाली दिलेल्या **Login** बटणावर क्लिक करा. **(4)**



स्टेप 1-A: विद्यार्थ्यांसाठी: Username / Password विसरल्यास


तुम्हाला तुमचा **Username** किंवा **Password** माहित नसेल, तर खालीलप्रमाणे करा.

1. लॉगिन पेजवर खाली असलेल्या **Forgot Username/Password** लिंकवर क्लिक करा. **(1)**



चित्र 1.1: Forgot Username/Password लिंक

2. नवीन पेज उघडेल. त्यात **Email** मध्ये तुमचा ईमेल टाका. **(2)**
3. **Contact Number** मध्ये तुमचा मोबाईल नंबर टाका. **(3)**
4. खाली **Get Password** बटणावर क्लिक करा. **(4)**




चित्र 1.2: Email, Contact Number आणि Get Password

5. तुमचा **USERNAME** आणि **PASSWORD** तुमच्या ईमेलवर येईल. त्यानंतर स्टेप 1 प्रमाणे लॉगिन करा.



स्टेप 1-B: रिसर्च सेंटर आणि गाईडसाठी लॉगिन

ही स्टेप **रिसर्च सेंटर** आणि **गाईड** या दोघांसाठी आहे. दोघांनीही याच पेजवरून लॉगिन करायचे आहे.



चित्र 1.3: रिसर्च सेंटर आणि गाईड लॉगिन पेज


1. कोणताही ब्राउझर (Chrome, Edge इत्यादी) उघडा.
2. वरती ॲड्रेस बारमध्ये **https://pet.srtmun.ac.in/admin/login** हे टाका आणि Enter दाबा.
3. **Email address** मध्ये तुमचा ईमेल टाका. **(3)**
4. **Password** मध्ये तुमचा पासवर्ड टाका. **(4)**
5. खाली दिलेल्या **Login** बटणावर क्लिक करून लॉगिन करा. **(5)**

Supervisor साठी त्यांचा असलेला ईमेलच **Username** असेल, आणि **Research Center** साठी **RC_(जिल्ह्याचे आद्याक्षर)_(Research Center Code)@srtmun.ac.in** असा असेल (Nanded = ND, Latur = LR, Parbhani = PB, Hingoli = HG), उदाहरणार्थ **RC_ND_777@srtmun.ac.in**.

महत्त्वाचे: गाईड / रिसर्च सेंटरना लॉगिन माहिती (Email / Password) मिळाली नसेल, तर **pet@srtmun.ac.in** वर मेल करावा.



स्टेप 2: Course Work वर क्लिक करणे




चित्र 2: डाव्या बाजूचा मेनू

1. लॉगिन केल्यावर **डाव्या बाजूला** एक मेनू दिसेल.
2. मेनूमध्ये खाली **Course Work** हा पर्याय आहे (लाल बॉक्समध्ये दाखवला आहे), त्यावर क्लिक करा.



स्टेप 3: Course Work फॉर्म भरणे

Course Work वर क्लिक केल्यावर हा फॉर्म उघडेल. वरचा सर्व तपशील (Faculty, Subject, Name, Mother's Name, Gender, Email ID, Mobile Number, Address, Category, Supervisor, Research Center) **आपोआप येतो**, तो भरण्याची गरज नाही.




चित्र 3: Course Work फॉर्म

1. **ABC / APAAR ID** (बॉक्स 1): या रकान्यात तुमचा ABC / APAAR ID क्रमांक टाका.
2. **ABC / APAAR ID Certificate** (बॉक्स 2): **Choose File** बटणावर क्लिक करा, तुमचे ABC / APAAR ID प्रमाणपत्र निवडून अपलोड करा.
3. **Mentor & local chapter** (बॉक्स 3): खाली दोन प्रश्न आहेत, त्यांची उत्तरे **Yes** किंवा **No** निवडून द्या:
   - Have you chosen your guide as a mentor on the SWAYAM platform?
   - Enrolled through SRTM's SWAYAM Local Chapter?
4. उत्तर **No** असल्यास तिथे **कारण (reason)** लिहावे लागेल, ते लिहा.



स्टेप 4: SWAYAM course details भरणे

खाली स्क्रोल केल्यावर **SWAYAM course details** चा तक्ता दिसेल. त्यात तीन कोर्स असतील: Research Methodology, Computer Application आणि Research & Publication Ethics.



चित्र 4: SWAYAM course details तक्ता

1. **Course** ड्रॉपडाउनमधून तुमचा कोर्स निवडा.
2. **Result** मध्ये **Pass** किंवा **Fail** निवडा.
3. **Marks /100** मध्ये तुमचे गुण टाका.
4. **Certificate** स्तंभात **Choose File** वर क्लिक करून त्या कोर्सचे प्रमाणपत्र अपलोड करा.
5. तिन्ही कोर्स भरल्यावर खाली **Submit** बटणावर क्लिक करा.

> **महत्त्वाचे:** Co-ordinator, Duration, Converted Credits आणि Status हे आपोआप येतात, ते भरण्याची गरज नाही.



स्टेप 5: Certificate अपलोड करणे

प्रमाणपत्र अपलोड करण्यापूर्वी खालील **Sample Certificate** (नमुना प्रमाणपत्र) पाहा आणि तुमचे प्रमाणपत्र त्याप्रमाणे बरोबर आहे याची खात्री करा.




चित्र 5: Sample Certificate (डावीकडे SWAYAM / IGNOU, उजवीकडे NPTEL)

1. SWAYAM course details तक्त्याच्या वरती उजवीकडे **Sample Certificate** ही लिंक आहे, त्यावर क्लिक करून नमुना पाहा.
2. वरील चित्रातील नमुन्याप्रमाणे तुमचे प्रमाणपत्र **बरोबर** आहे का ते नीट पाहा.
3. नंतर **Certificate** स्तंभात **Choose File** वर क्लिक करून तेच प्रमाणपत्र अपलोड करा.



स्टेप 6: Course Work चा Status तपासणे

Submit केल्यानंतर तुमचा Course Work चा **Status** खालील चित्राप्रमाणे **Pending** असा दिसेल.



चित्र 6: Submit केल्यानंतर Status

1. तुमचा Course Work submit झाला की Status मध्ये **Pending** असे दिसेल (लाल बॉक्समध्ये दाखवले आहे).
2. त्यानंतर तुमच्या **गाईडला** कळवा की तुम्ही Course Work submit केला आहे.

तांत्रिक मदत (Technical Helpline)

फॉर्म भरताना किंवा लॉगिन करताना काही अडचण आल्यास खालील क्रमांकावर किंवा ईमेलवर संपर्क साधा.

हेल्पलाइन क्रमांक	9511792358,7709777983,9881341228
ईमेल	pet@srtmun.ac.in

Shivling S. Patil
System Expert & Nodal Officer
Computer Centre
Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded-431606
Maharashtra State, India